# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:06.06.2026** **वार:शनिवार**

1. हरित भविष्याच्या दिशेनं सुरू असलेल्या जगाच्या वाटचालीत भारताचं सक्रियपणे योगदान देत असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
2. रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढाव्यात रेपो दर जैसे थे
3. राज्यात विविध कार्यक्रमांद्वारे जागतिक पर्यावरण दिन साजरा आणि
4. अठरा वर्षांखालील मुलांच्या आशिया चषक हॉकी स्पर्धेत पाकिस्तानवर विजय मिळवत भारत अंतिम फेरीत

**पंतप्रधान-सुरत**

संपूर्ण जग हळूहळू हरित भविष्याकडे वाटचाल करत असून भारत या स्थित्यंतरात सक्रियपणे योगदान देत असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल केलं. गुजरातमधील सुरत इथं विविध महत्त्वाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांचं लोकार्पण आणि पायाभरणी करताना ते बोलत होते. वडोदरा-मुंबई द्रुतगती महामार्गाच्या सहाव्या आणि सातव्या टप्प्याचं राष्ट्रार्पण यावेळी पंतप्रधानांनी केलं. या प्रकल्पामुळे गुजरात आणि महाराष्ट्रादरम्यान अतिजलद वाहतूक आणि दळणवळणाला मोठी चालना मिळणार आहे.

**रेपोदर**

रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढावा समितीच्या द्वैमासिक बैठकीत घेतलेल्या निर्णयांची काल मुंबईत घोषणा करण्यात आली. सर्व प्रमुख व्याजदर जैसे थे ठेवण्याचा निर्णय समितीनं घेतला आहे. त्यामुळं रेपो दर सव्वा 5 टक्क्यांवर कायम राहणार आहे. मात्र देशाचा आर्थिक वाढीच्या दराचा अंदाज 6 पूर्णांक 9 दशांश टक्क्यांवरुन कमी करून 6 पूर्णांक 6 दशांश टक्के केला आहे. जागतिक पुरवठा साखळीत निर्माण झालेले अडथळे, यंदा पाऊस कमी होण्याचा अंदाज यामुळं आर्थिक वाढीचा दर कमी होण्याची शक्यता गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी व्यक्त केली. तथापि जागतिक पातळीवर प्रतिकूल परिस्थिती असताना भारत समर्थपणे आर्थिक अडचणींना तोंड देत असल्याचं मल्होत्रा यांनी द्वैमासिक पतधोरण आढावा जाहीर केल्यानंतर पत्रकार परिषदेत बोलताना नमूद केलं. ग्राहक किंमत निर्देशाकांवर आधारित चलनफुगवट्याचा दर चालू आर्थिक वर्षात 5 पूर्णांक 1 दशांश टक्के राहील, असंही रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे.

देशात चलनी नोटांकरता प्लॅस्टिकचा वापर करण्याचा विचार अगदी प्राथमिक पातळीवर असल्याचं त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं. बाजारात चलनी नोटांच्या उपलब्धतेवर रिझर्व बँकेचं लक्ष असून आवश्यक असेल तेव्हा नोटा उपलब्ध करुन दिल्या जातील असं त्यांनी स्पष्ट केलं. अधिकाधिक परकीय भांडवल भारतात आकर्षित करण्यासाठी काही उपायांची घोषणा रिझर्व्ह बँकेनं काल केली. त्यानुसार सरकारी कर्ज रोखे आता अधिक कालावधीसाठी जारी केले जाणार आहेत. याशिवाय परदेशात राहणाऱ्या भारतीय वंशाच्या नागरिकांना भारतीय शेअर बाजारात अधिक प्रमाणात गुंतवणूक करण्याची मुभा रिझर्व्ह बँकेनं दिली आहे.

**पर्यावरण दिन**

अनेकविध नावीन्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून काल राज्यात ठिकठिकाणी जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. पर्यावरण दिनाचं औचित्य साधून दरवर्षी प्रमाणे वृक्षारोपण कार्यक्रमांचं आयोजन करण्याबरोबरच कुठे सायकल फेऱ्या काढून, तर कुठे स्वच्छता मोहिमा राबवून, प्लास्टिक कचरा हटवून पर्यावरणाच्या रक्षणाचा संदेश देण्यात आला. बोरिवली

इथल्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात केंद्रीय कर्मचारी निवासस्थान संकुलाचं भूमिपूजन आणि पर्यावरण जनजागृतीसाठी तयार केलेल्या विशेष प्रचार वाहनाचं उद्घाटन वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते करण्यात आलं. पर्यावरण संवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाने त्यात सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील राज्यव्यापी 300 कोटी वृक्षलागवड अभियानातून महाराष्ट्र हरित आणि पर्यावरणदृष्ट्या अधिक सक्षम होईल, असा विश्वास नाईक यांनी व्यक्त केला.

पुणे महानगरपालिकेच्या उद्यान आणि वृक्ष प्राधिकरण विभागामार्फत छत्रपती संभाजीराजे उद्यानात वनमहोत्सव, वृक्षारोपण, अल्प दरात रोपेवाटप तसेच बीज संकलन केंद्र उपक्रमांचे उद्घाटन करण्यात आलं. पिंपरी चिंचवड महापालिकेनं शहराचं वैभव असलेल्या दुर्गादेवी टेकडी सारख्या अन्य ठिकाणी पाच लाख झाडं लावून ती जगविण्याचा संकल्प केला. कोल्हापूर जिल्हा प्रशासन आणि माय भारत कोल्हापूर यांनी सायकल फेरी काढून; पर्यावरण संवर्धन, इंधन बचत आणि सुदृढ आरोग्याचा संदेश दिला. रत्नागिरीच्या चिपळूण तालुक्यातल्या कळंबस्ते इथे उभारण्यात आलेल्या 'द बोटॅनिकल गार्डन' या मानवनिर्मित देवराई प्रकल्पातल्या झाडांचा पहिला वाढदिवस काल उत्साहात साजरा करण्यात आला. परभणीचे जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी काल स्वतः सायकलवरून कार्यालयात येत पर्यावरण संवर्धनाचा आणि इंधन बचतीचा प्रभावी संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचवला.

<u>**एसटी स्वच्छता**</u>

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने राज्यव्यापी अत्याधुनिक स्वच्छता मोहिमेचा आरंभ मुंबईत परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आला. या मोहिमेअंतर्गत राज्यभरातील प्रमुख बसस्थानकं आणि त्यांचा परिसर आंतरराष्ट्रीय दर्जाच्या अत्याधुनिक स्वच्छता उपकरणांच्या सहाय्याने नियमितपणे स्वच्छ करण्यात येणार आहे. तसेच एसटी बसेस, चालक-वाहक विश्रांतीगृहे आणि प्रसाधनगृहे यांची दर चार तासांनी स्वच्छता करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

<u>**सर्वोच्च न्यायालय- एआय**</u>

देशाच्या न्याय व्यवस्थेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा अर्थात एआयचा जबाबदार वापर करण्याच्या अनुषंगानं सर्वोच्च न्यायालयानं नियमावलीचा मसुदा तयार केला आहे. हा मसुदा सर्वोच्च न्यायालयाच्या एआयविषयक समितीच्या नेतृत्वाखाली संबंधित घटकांशी झालेल्या सल्लामसलत, चर्चेवर आधारित असून त्यावर येत्या 20 जूनपर्यंत सूचना पाठवण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. यासंदर्भात ज्येष्ठ विधिज्ञ ॲडवोकेट उदय वारुंजीकर यांनी दिलेली माहिती...

**संपूर्ण जगामध्ये विविध पातळीवरती कृत्रिम बुद्धिमत्तेच्या बाबतीमध्ये विविध प्रयोग केले जात आहेत. न्यायसंस्था ही देखील त्याला काही अपवाद नाही. न्यायसंस्थेमध्ये जर कृत्रिम बुद्धिमत्तेचा जर वापर करायचा झाला, तर साहजिकच प्रश्न निर्माण होतो की त्या कृत्रिम बुद्धिमत्तेला कशाप्रकारे नियंत्रण करणं शक्य आहे आणि त्या संदर्भामध्ये सर्वोच्च न्यायालयाने एक मसुदा हा सगळ्यांच्या माहितीसाठी म्हणून सादर केलेला आहे. त्यांच्या वेबसाईट वरती उपलब्ध आहे. त्या मसुद्यावरती लोकांच्या सूचना हरकती या सगळ्या मागितलेल्या आहेत. निश्चितच कृत्रिम बुद्धिमत्ता याचा जर वापर करायचा असेल तर तो कसा केला जाऊ शकतो, त्याला नियंत्रण कसं घालणं शक्य आहे? या विषयाबद्दलचे वेगवेगळे पैलू या संपूर्ण ड्राफ्ट रेग्युलेशन च्या निमित्तानं चर्चेस आहेत. त्यामुळे आपल्या सर्व श्रोत्यांना आवाहन की आपण तो जो काही मसुदा आहे तो आपण वाचावा त्याच्यावरती आपले जे काही सूचना असतील ते सादर करावं.**

<u>**साधुग्राम निधी मान्यता**</u>

नाशिकमधे साधुग्राम प्रकल्पाकरता 191 एकर 21 गुंठे जमिनीच्या संपादनासाठी 2 हजार 267 कोटी रुपये खर्चाला राज्यशासनानं मान्यता दिली आहे. नगरविकास विभागानं काल हा शासन निर्णय जारी केला. हा निधी अन्यत्र वळवता येणार नाही, वळवला गेल्यास संबंधितावर कठोर कारवाई केली जाईल असं या आदेशात म्हटलं आहे.

**नीट निर्देश**

वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीची 'नीट' देणाऱ्या राज्यातील विद्यार्थ्यांसाठी पारदर्शक आणि तणावरहित वातावरण असावे. सर्व यंत्रणांनी सतर्क राहून परीक्षा केंद्रांवर आवश्यक उपाययोजना कराव्यात तसंच परीक्षेदरम्यान कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार होऊ नये, यासाठी अधिक दक्षता घ्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिले. मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानी नीट परीक्षेच्या पूर्व तयारीसंदर्भात झालेल्या बैठकीत त्यांनी हे निर्देश दिले. सर्व परीक्षा केंद्रांवरील सीसीटीव्ही यंत्रणा कार्यरत ठेवून त्याचे नियंत्रण करावं, सायबर सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक सर्व प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात. विद्यार्थी आणि पालकांच्या मनात कोणताही संभ्रम निर्माण होणार नाही, याची विशेष काळजी घ्यावी अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना केल्या.

**महाडीबीटी बियाणे**

राज्यातील शेतकऱ्यांना सुलभ आणि पारदर्शक पद्धतीनं दर्जेदार बियाणं उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विभागानं यंदा महत्त्वपूर्ण पाऊल उचललं आहे. खरीप हंगामासाठी आवश्यक असलेली प्रमाणित बियाणं आता महाडीबीटी पोर्टलवर प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. इच्छुक शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर जाऊन तात्काळ अर्ज करावेत, असे आवाहन राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी केलं आहे.

**हॉकी**

जपानमध्ये सुरु असलेल्या 18 वर्षांखालील मुलांच्या आशिया चषक हॉकी स्पर्धेत भारतीय संघानं अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. उपांत्य फेरीत भारतीय संघाने पाकिस्तानचा 5-3 असा पराभव केला. आज अंतिम सामन्यात भारताची लढत यजमान जपानशी होणार आहे. मुलींच्या 18 वर्षांखालील आशिया चषक स्पर्धेत भारतीय संघाला उपांत्य फेरीत चीनकडून पराभव पत्करावा लागला.

**हवामान-पाऊस-सांगली,सातारा**

सांगली आणि सातारा जिल्ह्यातील विविध तालुक्यात काल रात्री मेघगर्जनेसह जोरदार पाऊस झाला. पुणे जिल्ह्यात इंदापूर तालुक्यासह बारामती शहर आणि परिसरात काल जोरदार पाऊस झाला. आज कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.